# महाराष्ट्र लोकसेवा आयोग

## MAHARASHTRA PUBLIC SERVICE COMMISSION


मुख्य कार्यालय

बँक ऑफ इंडिया इमारत, ३ रा मजला, महात्मा गांधी मार्ग, हुतात्मा चौक, मुंबई ४००००१ ☎ २२६७ ०२१० /१४८ /२४८,२२१०२२२२ फॅक्स : २२६७३९१५

Bank of India Bldg, 3rd floor, Mahatma Gandhi Road, Hutatma Chowk, Mumbai 400001 ☎ 2267 0210 /148 /248, 22102222 Fax : 22673915

**माझगांव कार्यालय**

विक्रीकर भवन, ९ वा मजला,रुम नंबर ९१५, सरदार बलवंतसिंग दोधी मार्ग, माझगांव, मुंबई ४००२०३ ☎ २३७४२१९१ फॅक्स : २३७८१०६१

Vikrikar Bhavan, 9th floor, Room No.915, Sardar Balvantsing Dodhi Marg, Mazgaon, Mumbai 400203 ☎ 23742191 Fax : 23781061

**ई-मेल sec_mpsc@maharashtra.gov.in, mpscpre@gmail.com वेबसाईट – www.mpsc.gov.in, www.mpsconline.gov.in**


**विक्रीकर निरीक्षक (पूर्व) परीक्षा -२०११ क्रमांक १४४२(२)(१)/२०११/तीन**

**जाहिरात क्रमांक : ८३/२०११**

**आयोगातर्फे** विक्रीकर निरीक्षक **(पूर्व) परीक्षा-२०११ रविवार दिनांक २५ सप्टेंबर, २०११ रोजी** महाराष्ट्रातील विविध ३५ जिल्हाकेंद्रावर घेण्यात येईल. प्रस्तुत जाहिरातीत नमूद केलेल्या अटींची पूर्तता करणा-या उमेदवारांकडून ऑनलाईन पद्धतीने अर्ज मागविण्यात येत आहेत. पूर्व परीक्षेत अर्हताप्राप्त ठरणा-या उमेदवारांना मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र समजण्यात येईल.

२. उपलब्ध पदसंख्या :-

| अ.क्र. | पदाचे नाव व एकूण पदसंख्या | अराखीव | अ.जाती व त्यातील बौध्द धर्मांतरित | अनुसूचित जमाती | उन्नत व प्रगत गटात न मोडणारे | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | वि.जा. (अ) | भ.ज.(ब) | वि.मा.प्र. | भ.ज.(क) | भ.ज.(ड) | इ.मा.व. |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ |
| १ | विक्रीकर निरीक्षक (एकूण पदे १६८) | ८४ | १५ | १८ | ३ | ६ | २ | ७ | ४ | २९ |
| | महिला - | २५ | ५ | ५ | १ | २ | १ | २ | २ | ८ |
| | खेळाडू - | ४ | -- | १ | -- | -- | -- | -- | -- | २ |
| | अपंग- | अंधत्व किंवा क्षीण दृष्टी -१ पद, श्रवणशक्तीतील दोष -२ पदे, चलनवलन विषयक विकलांगता किंवा मेंदूचा अर्धांगवायू - २ पदे | | | | | | | | |

२.१ वर नमूद केलेल्या पदसंख्येत व आरक्षणात शासनाच्या संबंधित विभागाच्या सूचनेनुसार बदल होण्याची शक्यता आहे. २.२ महिलांसाठी व खेळाडूंसाठी आरक्षित असलेली पदे सबंधित वर्गवारीतील भरावयाच्या एकूण पदसंख्येपैकी असतील. २.३ महिलांसाठी असलेले आरक्षण शासन निर्णय, महिला व बालविकास विभाग,क्रमांक ८२/२००१/म.से.आ.२०००/ प्र.क्र.४१५/ का-२, दिनांक २५ मे, २००१ आणि तद्नंतर शासनाने या संदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार राहील. २.४ अपंगासाठी असलेली पदे भरावयाच्या एकूण पदसंख्येपैकी असतील. २.५ अपंगासाठी आरक्षित असलेल्या पदावर स्पर्धा परीक्षेद्वारे शिफारस करताना उमेदवार कोणत्या सामाजिक प्रवर्गातील आहे, याचा विचार न करता गुणवत्ता क्रमानुसार त्याची शिफारस करण्यात येईल. २.६ अपंग उमेदवारांना गुणवत्तेनुसार लेखनिकाची मदत घेता येईल. तथापि त्यांनी तसे आयोगास स्वतंत्ररित्या पत्राने कळविणे आवश्यक आहे. २.७ खेळाडूंचे आरक्षण शासनाने यासंदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार राहील.

३. वेतनश्रेणी :- रु. ९,३००-३४,८००(ग्रेड पे- ४,३००) अधिक भत्ते एकूण वित्तलब्धी अंदाजे रु. २१,७५२/-

४.पात्रतेच्या अटी :- ४.१ भारतीय नागरिक. ४.२ वयोमर्यादा - १ डिसेंबर, २०११ रोजी किमान १९ वर्षे असावे व ३३ वर्षापेक्षा (मागासवर्गाकरिता ३८ वर्षापेक्षा) जास्त नसावे. ४.३ उच्च वयोमर्यादा खालील बाबतीत शिथिलक्षम :- ४.३.१ महाराष्ट्र शासनाने मान्यता दिलेल्या मागासवर्गीय उमेदवारांकरिता ५ वर्षापर्यंत शिथिलक्षम राहील. ४.३.२ पात्र खेळाडूंच्या बाबतीत ५ वर्षापर्यंत.४.३.३ विक्रीकर निरीक्षक हे पद शासनाने गट-ब (अराजपत्रित) संवर्गात समाविष्ट केले असल्यामुळे सदर पदासाठी शासनाने माजी सैनिकांसाठी आरक्षण विहित केलेले नाही. माजी सैनिकांच्या आरक्षणासंदर्भात उच्च न्यायलयात प्रकरण प्रलंबित आहे. ४.३.४ माजी सैनिकांसाठी उच्च वयोमर्यादा शासकीय आदेशानुसार शिथिलक्षम र ाहील. ४.३.५आणीबाणी व अल्पसेवा राजादिष्ठ अधिकारी यांचेसाठी कमाल वयोमर्यादा ५ वर्षाने शिथिल केली जाईल.४.३.६ अपंग उमेदवारांसाठी ४५ वर्षापर्यंत शिथिलक्षम राहील. ४.४ शैक्षणिक अर्हता :- ४.४.१ मान्यताप्राप्त विद्यापीठाची पदवी किंवा महाराष्ट्र शासनाने पदवीच्या समतुल्य म्हणून मान्य केलेली अर्हता. ४.४.२ मराठी भाषेचे ज्ञान आवश्यक ४.४.३ जे उमेदवार पदवीच्या शेवटच्या वर्षाच्या परीक्षेस बसले आहेत असे उमेदवार सुध्दा या पूर्व परीक्षेस तात्पुरते पात्र असतील. परंतु विक्रीकर निरीक्षक (मुख्य) परीक्षा-२०११ करिता अर्हताप्राप्त ठरणा-या उमेदवारांनी विक्रीकर निरीक्षक (मुख्य) परीक्षा- २०११ चा अर्ज स्वीकारण्याच्या अंतिम दिनांकापर्यन्त पदवी परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक राहील. ४.४.४ ज्या पदवीसाठी अंतर्वासिता (INTERNSHIP) निर्धारित केली असेल अशी पदवी धारण करणा-या उमेदवारांनी अंतर्वासिता मुख्य परीक्षेसाठी अर्ज सादर करण्याच्या अंतिम तारखेपूर्वी पूर्ण केली असेल तरच त्याला पदवीधर समजण्यात येईल.

५. प्रस्तुत जाहिरातीमध्ये परीक्षेसंदर्भातील संक्षिप्त तपशील दिलेला आहे.अर्ज करण्याची पद्धत, आवश्यक अर्हता, आरक्षण, वयोमर्यादा, शुल्क, निवडीची सर्वसाधारण प्रक्रिया, परीक्षा योजना, अभ्यासक्रम, इत्यादीबाबतच्या सविस्तर तपशीलासाठी आयोगाच्या www.mpsc.gov.in या वेबसाईटवरील स्पर्धा परीक्षा अंतर्गत "उमेदवारांना सर्वसाधारण सूचना " तसेच " परीक्षा " या विभागातील "विक्रीकर निरीक्षक परीक्षा" मध्ये उपलब्ध करुन देण्यात आलेल्या माहितीचे कृपया अवलोकन व्हावे. आयोगाच्या वेबसाईटवर प्रसिद्ध करण्यात आलेली माहिती व जाहिरात अधिकृत समजण्यात येईल.

६. प्रस्तुत पदांना शासनाने दिनांक ८ जून, २०१० रोजी निर्गमित केलेली "महाराष्ट्र शासकीय गट-अ व गट-ब (राजपत्रित व अराजपत्रित) पदांवर सरळसेवेने नियुक्तीसाठी विभागीय संवर्ग संरचना व विभागीय संवर्ग वाटप याबाबत नियमावली २०१० " लागू आहे.

७. शुल्क : ७.१ अमागास - रु. २६०/- ७.२ मागासवर्गीय - रु. १३५/- ७.३ सदर शुल्क ऑनलाईन अर्जाची नोंदणी केल्यावर प्राप्त होणा-या विहित चलनाद्वारे भारतीय स्टेट बँकेच्या कोणत्याही शाखेमध्ये कार्यालयीन वेळेत रोखीने भरावे लागेल. बँकेमध्ये रक्कम भरल्यानंतर बँकेकडून चलनावर उपलब्ध करुन देण्यात आलेल्या Transaction ID ची नोंद पुन्हा ऑनलाईन पध्दतीने अचूकरीत्या केल्याशिवाय अर्ज भरण्याची प्रक्रिया पूर्ण होत नाही.

८. अर्ज करण्याची पद्धत :- ८ .१ प्रस्तुत परीक्षेसाठी अर्ज फक्त ऑनलाईन पद्धतीने स्वीकारण्यात येतील. इतर कोणत्याही प्रकारे अर्ज स्वीकारण्यात येणार नाहीत.

८.२ पात्र उमेदवाराला वेब-बेस्ड (Web-based)ऑनलाईन अर्ज www.mpsconline.gov.in या वेबसाईटद्वारे दिनांक १० ऑगस्ट,२०११ ते ३० ऑगस्ट २०११ या कालावधीत सादर करणे आवश्यक राहील. ८.३ ऑनलाईन पद्धतीने अर्ज सादर करण्याच्या सविस्तर सूचना आयोगाच्या www.mpsconline.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. तसेच ऑनलाईन पद्धतीने अर्ज भरण्याचे प्रात्यक्षिक (Demo) सदर वेबसाईटवर पाहता येईल. ८.४ विहित पद्धतीने दोन्ही टप्प्यांतील अर्ज सादर करण्याची (ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करणे व परीक्षा शुल्क बँकेत जमा केल्यानंतर Transation ID नोंदविणे) संपूर्ण कार्यवाही आयोगाने विहित

केलेल्या कालावधीतच पूर्ण करणे आवश्यक आहे. ८.५ ऑनलाईन पद्धतीने अर्ज सादर करताना उमेदवाराजवळ स्वतःचा अद्ययावत (Latest) फोटो (रुंदी ३.५ से.मी x उंची ४.५ से.मी) व स्वतःचा ई मेलआयडी असणे आवश्यक आहे. तसेच स्वतःची स्वाक्षरी व स्वतःचा फोटो आयोगाच्या सूचनेनुसार विहित पद्धतीने स्कॅन करुन अपलोड करणे अनिवार्य आहे. ८.६ बॅंकेमध्ये रकमेचा भरणा केल्यावर शासकीय कार्यालयीन कामकाजाच्या दोन दिवसानंतर विहित पध्दतीने Transaction ID अचूकपणे नोंदवावा. बॅंकेकडून प्राप्त झालेल्या Transaction ID ची नोंद अचूकपणे करण्यात आली असेल तरच भरतीसंदर्भातील पुढील प्रक्रिया होऊ शकेल.

९. विहित पध्दतीने अर्ज सादर करुन शुल्क भरण्यासाठी चलनाची प्रत घेण्याची कार्यवाही दिनांक ३० ऑगस्ट, २०११ रोजी २३.५९ वाजेपर्यंत पूर्ण करणे आवश्यक आहे. त्यानंतर सदर वेबलिंक बंद होईल. चलनाद्वारे विहित शुल्क भारतीय स्टेट बॅंकेमध्ये दिनांक २ सप्टेंबर, २०११ पर्यंत बॅंकेच्या क ार्यालयीन वेळेत भरणे आवश्यक राहील.

१०.चलनाद्वारे शुल्क बॅंकेमध्ये भरल्यानंतर बॅंकेकडून प्राप्त होणारा Transaction ID दिनांक ४ सप्टेंबर, २०११ रोजी २३.५९ वाजेपर्यंत अचूकपणे नोंदविणे आवश्यक आहे. त्यानंतर सदर वेबलिंक बंद होईल.

११. आयोगाने विहित केलेल्या पद्धतीनुसार Transaction ID ची नोंद अचूकरित्या, विहित पद्धतीने व विहित कालावधित न करणाऱ्या उमेदवाराचा अर्ज स्वीकारला जाणार नाही.

मुंबई :
दिनांक : **१० ऑगस्ट , २०११**

**दी. प्र. मिरजकर**
उपसचिव,
महाराष्ट्र लोकसेवा आयोग